# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५.

क्रमांक पुविमं / माध्यमिक–क / अ / 6900
पुणे–411005.

**महत्वाचे तातडीचे**

दिनांक–22 / 11 / 2023.

प्रति,
मुख्याध्यापक, / प्राचार्य,
सर्व माध्यमिक शाळा / व कनिष्ठ महाविद्यालये
पुणे,अहमदनगर,सोलापूर .

विषय–माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा( इ.10वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा ( इ.12वी) जुलै–ऑगस्ट, 2023 परीक्षेची प्रमाणपत्र वाटपाबाबत...

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा( इ.10वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा( इ.12वी) जुलै–ऑगस्ट 2023 परीक्षेचा निकाल दि.28 / 08 / 2023 रोजी ऑनलाईन जाहीर करण्यात आलेला आहे.सदर परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका व तपशीलवार गुण दर्शविणारे शालेय अभिलेखाचे वाटप मंगळवार दिनांक–05 / 09 / 2023 रोजी करण्यात आलेले आहे.

सदरच्या परीक्षेमधील उत्तीर्ण विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे मंडळाकडे तयार आहेत. प्रमाणपत्रे स्विकारणेसाठी शाळेच्या अधिकृत प्रतिनिधीस शिफारस पत्रासह मंडळ कार्यालयात पाठविण्यात यावे व उपरोक्त साहित्य ताब्यात घ्यावे . तसेच सदर साहित्य तपासून घेण्यात यावे.त्यामध्ये काही त्रुटी असल्यास तात्काळ मंडळास लेखी कळविण्यात यावे. सदरची प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांना वाटप करून त्याचा अहवाल विभागीय मंडळास सादर करावा. याची सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांनी दक्षता घ्यावी.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे–411005.

प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी
1.विभागीय शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग पुणे.
2.शिक्षणाधिकारी(माध्यमिक)जिल्हा परिषद पुणे,अहमदनगर,सोलापूर